## <u>निशाणी क्र.५ खालील आदेश</u>

(अधिघोषीत दि.०८ ऑक्टोबर २०२४)

अर्जदाराने प्रस्तुतची मागणी निशाणी क्र.५ खाली महिलांचे घरगुती हिंसाचारापासून प्रतिबंधक कायद्याचे कलम २३(२) अन्वये अंतरीम आदेशाकरीता शपथपत्र दाखल करून अर्जातील मजकुर हा शपथपत्राचा भाग गृहीत धरण्यात यावा असे नमूद केलेले आहे.

**<u>अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u> –**

**०२.** दि.१०/०६/२०१२ रोजी अर्जदाराचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत रितीरिवाजाप्रमाणे झालेले असून, आजतागायत त्यांच्यातील लग्नसंबंध कायम आहेत. अर्जदाराचे कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ चे गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचेशी अनैतिक संबंध आहेत. तिने पुढे असे कथन केले की, तिचे व गैरअर्जदार क्र.१ चे सदरचे दुसरे लग्न असून गैरअर्जदार क्र.१ यांना पहिल्या पत्नीपासून एक मुलगा नामे विनय उमाजी रामटेके व अर्जदार हिला पहिल्या पतीपासून एक मुलगी नामे दिव्यांका उमाजी रामटेके आहे. अर्जदार ही नांदण्याकरीता गैरअर्जदार क्र.१ कडे आली असता, काही वर्ष त्यांचा संसार सुरळीत चालला व त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हे दारूचे सेवन करून यायचे व त्यांना अश्लील शिवीगाळ करून मारहाण करत असल्याचे व अर्जदार तिचे नातवाईकांसोबत बोलली तरी तिच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याचे आणि ''तुझे कुठतरी अनैतिक संबंध सुरू आहे'' असे म्हणत असल्याचे तिने नमूद केलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ हे अत्यंत चिडखोर प्रवृत्तीचे असून त्यांचे गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचेसमवेत अनैतिक संबंध असल्याचे तिचे कथन आहे.

**०३.** अर्जदाराचे पुढील कथनानुसार, गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदाराचे घरासमोर

राहत असून गैरअर्जदार क्र.१ चे तिचेसोबत अनैतिक संबंध होते व त्यामुळे ते गैरअर्जदार क्र.२ शी मोबाईलवरून व्हीडीओ कॉल करून दिवस–रात्र अश्लील चाळे करून बोलत असतात. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.२ हे नियमित ओयो हॉटेलमध्ये भेटून शारिरीक संबंध प्रस्थापित करत असल्याचे व गैरअर्जदार क्र.२ ही गैरअर्जदार क्र.१ यांना लुबाडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळत असल्याचे अर्जदाराने नमूद केलेले आहे.

**०४.** अर्जदाराचे पुढील कथनानुसार, गैरअर्जदार क्र.३ ही तिला गैरअर्जदार क्र.१ विषयी भडकावित असून तिचेदेखील गैरअर्जदार क्र.१ समवेत अनैतिक संबंध आहेत. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हे वे.को.ली., सास्ती क्षेत्र, धोपटाळा येथे नौकरीवर असून त्यांना मिळत असलेले मासिक वेतन ते गैरअर्जदार क्र.२ व ३ यांच्यावर उधळत असल्याचे तिचे कथन आहे.

**०५.** अर्जदाराचे पुढील कथनानुसार, काही वर्षापुर्वीपासून गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारासमवेत शारिरीक संबंध प्रस्थापित करत नसल्याने त्याबाबत तिने गैरअर्जदारास विचारणा केली असता, गैरअर्जदार क्र.१ ने तिला घराबाहेर काढून जबर मारहाण केली व धमकी दिली की, ''जर तु याबद्दल विचारणा केली तर मी गैरअर्जदार क्र.२ सोबत लग्न करणार व तुला घटस्फोट देणार''. तिचे पुढील कथनानुसार, काही दिवसांनी गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारावर काही दिवस बळजबरीने शारिरीक संबंध प्रस्थापित करून तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला.

**०६.** अर्जदाराचे पुढील कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ हा गैरअर्जदार क्र.२ ला स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा राजुरा या खात्यातून अनेकदा ऑनलाईन व चेकद्वारे पैसे देत असतो. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना तिचे पतीसोबत अनैतिक संबंध ठेऊ नका असे म्हणून सांगितले असता, त्यांनी अर्जदाराच्या घरात प्रवेश करून तिला अश्लील शिवीगाळ करून मारहाण केल्याचे तिने नमूद केलेले आहे. अर्जदाराकडे गैरअर्जदार क्र.१ चे

गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचेशी अनैतिक संबंध असल्याबाबतचे ठोस पुरावे असल्याचे व त्यामुळे तिचे जिवाला धोका निर्माण होऊन भविष्यात अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे तिचे कथन आहे. अर्जदाराला गैरअर्जदार क्र.१ हा नेहमी मानसिक व शारिरीक त्रास देत असून दररोज अश्लील शिवीगाळ करीत असल्यामुळे तिला जिवन जगणे कठीण झाल्याचे तिचे कथन आहे.

**०७.** अर्जदाराच्या पुढील कथनानुसार, तिच्याकडे स्वतःचे पालन पोषण करण्याकरीता उत्पन्नाचे कोणतेही स्थायी साधन नाही. याउलट, गैरअर्जदार क्र.१ हे वे.को.ली. येथे नौकरीवर असून त्यांना प्रतिमहा रू.१,००,०००/– वेतन मिळते. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ हे चांदागड फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड या कंपनीचे अध्यक्ष असल्यामुळे त्याद्वारेदेखील ते पैसे कमवित असल्याचे तिने नमूद केलेले आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ वर अर्जदाराव्यतिरीक्त ईतर कुणाचेही पालन पोषणाची जबाबदारी नसल्याचे तिने नमूद केलेले आहे. उपरोक्त परीस्थितीत, अंतरीम पोटगीकामी रक्कम रुपये १०,०००/– प्रतिमाह मिळण्याची विनंती करून तिचा अंतरीम मागणीचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**०८.** अर्जदाराने तिचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र नि.क्र.११ दाखल केलेले असून त्यामध्ये त्यांना तिचे व तिचे मुलीचे उरनिर्वाहाकरीता दरमहा रू.२०,०००/– खर्च येत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे दस्तऐवजाची यादी नि.क्र.१४ नुसार त्यांचे पहिल्या पतिसमवेत सोडचिठ्ठी झालेली असल्याबाबतचे श्रीमान एस. के. जैन, सत्र न्यायाधीश, बुरहानपुर (मध्य प्रदेश) ची झेरॉक्स कॉपी दाखल केलेली आहे. सदर दस्तावरून अर्जदाराचे पहिले लग्न संपुष्ठात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. उपरोक्त परिस्थीतीत, अर्जदाराने सदरचा अर्ज मंजूर होण्याची विनंती केलेली आहे.

**<u>गैरअर्जदारांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u>** –

**०९.** गैरअर्जदार क्र.१ यांनी निशाणी क्र.०९ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह झाल्याचे मान्य केलेले असुन या व्यतिरीक्त त्यांनी अर्जदाराची संपुर्ण कथने नामंजुर असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच त्यांच्या विशेष कथनानुसार, त्यांची पहिली पत्नी मरण पावल्यानंतर त्यांच्या मुलाचे संगोपणासाठी त्यांचे घरच्या लोकांच्या आग्रहास्तव त्यांनी अर्जदाराशी दुसरे लग्न केले. लग्नाच्या वेळी अर्जदाराने तिचे पहिल्या पतिपासून सोडचिठ्ठी झाल्याचे त्यांना खोटे सांगितले असून तिची सोडचिठ्ठी झालेली नसल्याचे व गैरअर्जदार क्र.१ यांना कोणतीही पुर्वकल्पना न देता अर्जदाराला पहिल्या पतीपासून झालेल्या मुलीचे जन्म दाखल्यावर गैरअर्जदार क्र.१ चे नांव चढविल्याचे आणि तरीदेखील त्यांनी अर्जदाराचे मुलीची जबाबदारी स्विकारल्याचे त्याने नमूद केलेले आहे.

**१०.** गैरअर्जदार क्र.१ चे पुढील कथनानुसार, त्यांच्या मुलाचे ९ व्या वर्गासाठी नवोदय विद्यालय, बाळापूर येथे निवड झाली व तो तेथेच राहू लागला आणि घरी अर्जदार, अर्जदाराची मुलगी व गैरअर्जदार क्र.१ हे तिघेच रहायचे. लग्नानंतर काही दिवसांनी अर्जदाराने त्याचेकडे घरी सोफा, आलमारी घ्या व फिरायला चला म्हणून तगादा लावत असल्याचे, परंतु ते सदर मागण्या पुर्ण करू शकत नसल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे. कारण त्यांची पहिली पत्नी १० वर्षे आजाराने ग्रस्त असल्याने तिचे औषोधोपचारावर त्यांचा अतोनात पैसे खर्च झाल्याने त्यांची आर्थीक परिस्थीती खालावलेली असल्याचे त्यांचे कथन आहे. त्याचप्रमाणे अर्जदार ही समजून घेण्याच्या मानसिकतेत नसून ती क्षुल्लक कारणांवरून गैरअर्जदार क्र.१ सह भांडण करून ''इतना पगार मिलता है तो क्या करते हो'' असे म्हणत असल्याचे आणि ते ओव्हरटाईम कर्तव्यावर असतांना त्यांना फोन करून अवाच्च शिवीगाळ करून ''कोनसी ड्युटी है, कही आना नही, जाना नही ये कोणसी जिंदगी है,

बाकी लोग देखो क्या करते है'' असे म्हणत असल्याचे त्यांचे कथन आहे.

**११.** गैरअर्जदार क्र.१ च्या पुढील कथनानुसार, त्यांचा मुलगा सुट्ट्यांमध्ये घरी आला असता, अर्जदार जाणूनबुजून त्यांच्याशी भांडण करायच्या व जमिनीवर झोपून अंगात येण्याचे नाटक करून शिवीगाळ करायच्या. अर्जदार या त्यांना ''मी कोणापेक्षा कमी नाही, मेरा बाप नौकरी पे था, हम खाते पिते घर से आए है, ऐसी भिकारी की जिंदगी जिनी पड रही है'' अस म्हणून ''मी मुलीला घेऊन आत्महत्या करतो व तुझ्या नावाची चिट्ठी लिहून ठेवतो'' असे म्हणून धमकी देत असल्याचे व घरातून निघून जात असल्याचे गैरअर्जदाराने नमूद केलेले आहे. अर्जदार ही सतत गैरअर्जदार क्र.१ शी क्षुल्लक कारणांवरून भांडण करायच्या, त्यांना डबा करून देत नव्हत्या, ते रक्तदाब व हार्ट पेशंट असून त्यांची काळजी घेत नसल्याचे व त्यांच्याशी खोटे बोलून खिशातून पैसे काढून घेत असल्याचे त्यांचे कथन आहे.

**१२.** गैरअर्जदाराचे पुढील कथनानुसार, सन २०२३ मध्ये अर्जदाराने तिचे आईचे इंजीओप्लास्टीचे ऑपरेशन करण्याकरीता त्यांच्याकडे रू.५०,०००/- ची मागणी केली असता, त्यांनी अर्जदारास पैसे दिले व गावी जाण्याकरीता रू.५,०००/- अधिकचे दिले. तसेच गैरअर्जदार क्र.१ ने त्यांच्या नातेवाईकाला उसने दिलेले रू.२०,०००/- देखील अर्जदार परस्पर घेऊन माहेरी निघून गेल्या. परंतु, काही दिवसांनी गैरअर्जदार क्र.१ यांना कोणतेही ऑपरेशन झाले नसल्याचे कळाले व त्याबाबत त्यांनी अर्जदारास विचारणा केली असता, तिने नेकलेस बनविला असे सांगितले असल्याचे, तसेच त्या नेहमी खोटे बोलून पैसे उकळत असून कामासाठी ठेवलेले पैसेदेखील त्या चोरत असल्याचे गैरअर्जदार क्र.१ ने नमूद केलेले आहे. अर्जदार या घरातील खर्च अवाजवी दाखवून त्यांच्याकडून पैसे घ्यायच्या, तसेच त्या संशयी वृत्तीच्या असल्याने तिने वार्डात, समाजात व त्यांच्या संपुर्ण नातेवाईकांमध्ये गैरअर्जदार क्र.१ ची बदनामी केल्याचे त्यांचे कथन आहे.

**१३.** गैरअर्जदार क्र.१ च्या पुढील कथनानुसार, त्यांनी त्यांच्या कुटुंबातील सर्व सामाजिक व आर्थीक जबाबदा–या पार पाडल्या असून मुलीचे संपुर्ण शिक्षणाचा खर्चदेखील केलेला आहे. गैरअर्जदाराने अर्जदारास काटकसर करण्याकरीता म्हटले असता, अर्जदाराने त्यांना ''तु औरतो पे पैसे उडाता है तु हिजडा है'' अशा भाषेत त्यांचा अपमान करीत असल्याचे त्यांचे कथन आहे. गैरअर्जदार क्र.१ हे नौकरीवर असले तरी त्यांच्यावर गृहकर्ज रू.२७,१४,०००/– असून त्याकरीता दरमहा रू.२७,७३३/– इतका हफ्ता जातो. त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी बजाज फायनान्स यांचेकडून रू.६,५०,०००/– कर्ज घेतले असून त्याचा दरमहा रू.२४,०९२/– हफ्ता जातो, त्यांच्या मुलीचा नागपूर येथील हॉस्टेलचा खर्च रू.१५,०००/– व मुलीचे ॲलन कोचींग क्लासेसचा खर्च ते स्वतः करत असल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ हे आजदेखील अर्जदारासमवेत संसार करायला तयार असल्याचे आणि ते अर्जदारास वेगळी पोटगी देण्यास असमर्थ असल्याचे त्यांचे कथन आहे. सबब, अर्जदाराने केलेली अंतरिम पोटगीची मागणी फेटाळून लावण्याची विनंती गैरअर्जदार क्र.१ यांनी केलेली आहे.

**१४.** गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१० व १०–अ वर दाखल करून त्यांनी अर्जदाराची संपुर्ण कथने नामंजुर असल्याचे व त्यांचे सदर प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचे नमूद करून, सदर प्रकरणातून त्यांचे नांव वगळण्यात येण्याची विनंती केलेली आहे.

**१५.** अर्जातील कथन लक्षात घेता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झालेले असून त्याबाबतचे निष्कर्ष प्रस्तुत मुद्यासमोर नमुद करुन त्याबाबतची कारणमिमांसा खाली देत आहे.

| **अनु क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१.** | अर्जदाराने प्रथमदर्शनी तिच्यावर कौटुंबिक | |

| | | |
|---|---|---|
| | हिंसाचार झाल्याची बाब शाबीत करते काय ? | **होय** |
| ०२. | अर्जदार ही अंतरिम पोटगीसाठी रक्कम रू.२०,०००/- मिळण्यास पात्र असल्याचे प्रथमदर्शनी शाबित करतात काय ? | **अंशतः होय** |
| ०३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता–**

**१६.** प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने महिलांचे घरगुती हिंसाचापासून प्रतिबंधक कायद्याचे कलम २३ अन्वये मागणी केलेली आहे. प्रस्तुत कायद्याचे मुळ तत्व अथवा उद्देश लक्षात घेता पिडीत महिलेला त्वरीत न्याय मिळावा याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने केवळ प्रथमदर्शनी हिंसाचार झाल्याची बाब अर्जदाराने शाबीत करणे अपेक्षीत असते. अर्जदाराने शपथेवर दिलेला तोंडी पुरावा देखील त्याकरीता पुरेसा असतो.

**१७.** अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांना त्यांचे लग्न दि.१०/०६/२०१२ रोजी झाल्याची बाब मान्य आहे. अर्जदाराने शपथेवर कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यांचे गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचेशी अनैतिक संबंध असून ते अर्जदाराशी शारिरीक संबंध प्रस्तापित करीत नसल्याने, तिने त्याबाबत गैरअर्जदारास विचारणा केली असता, त्याने अर्जदाराला घराबाहेर काढून जबर मारहाण केली व ''जर तु या बद्दल विचारणा केली तर मी गैरअर्जदार क्र.२ सोबत लग्न करणार व तुला घटस्फोट देणार'' असे धमकावित होते. तसेच अर्जदाराने गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना गैरअर्जदार क्र.१ शी संबंध ठेवू नका असे म्हटले असता, त्यांनीदेखील घरात घुसून अर्जदाराला शिवीगाळ करून मारहाण केली

असल्याचे व त्यामुळे तिच्या जिवाला धोका निर्माण झाल्याचे तिचे कथन आहे. उपरोक्त परिस्थितीत, अर्जदाराने शपथेवर केलेल्या सदर विधानांवरून प्रथमदर्शनी तिचेवर कौटुंबीक हिंसाचार झाल्याची बाब अर्जदाराने प्रथमदर्शनी शाबीत केलेली आहे. सबब, मुद्दा क्र. ०१ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र २ व ३ करीता –</u>**

**१८.** गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र नि.क्र.१२ दाखल करून त्यांना त्यांचे नौकरीतून मासिक वेतन रू.७४,७३४/– मिळत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांचेवर गृहकर्ज रू.२७,१४,०००/– व बजाज फायनान्स चे शिक्षणासाठी घेतलेले कर्ज रू.६,५०,०००/– असून, त्यांचा दरमहा खर्च रू.४५,०००/– येत असल्याचे व मुलांच्या देखभालीचा खर्च रू. ३०,०००/– होत असल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यांनी दाखल केलेली दस्तऐवजाची यादी नि.क्र.१०–ब प्रमाणे अनेक दस्ताऐवज दाखल केलेले आहेत. सदर दस्तऐवजावरून त्यांच्यावर गृहकर्ज, बजाज फायनान्सचे कर्ज असल्याचे व त्यांनी त्यांच्या मुलाच्या व मुलीच्या शैक्षणिक खर्चाकरीता पैसे भरल्याचेदेखील प्रथमदर्शनी दिसून येते. गैरअर्जदार क्र.१ यांनी दस्तऐवजाची यादी नि.क्र.१६ दाखल करून त्याद्वारे मुलीच्या शिक्षणाकरीता ऑनलाईन पैसे भरल्याचे प्रथदर्शनी दिसून येते. तसेच त्यांनी मे २०२४ चे पगारपत्रक दाखल केलेले आहे. सदर पगारपत्रकावरून त्यांना रू.७४,७३४/– एवढे वेतन मिळत असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे गैरअर्जदार हे त्यांच्यावर असलेली मुलांच्या शैक्षणीक जबाबदा–या व्यवस्थितरित्या पार पाडत असल्याचेदेखील प्रथमदर्शनी दिसून येते.

**१९.** अर्जदाराने स्वतः अंतरिम मागणी अंतर्गत दरमहा पोटगीकामी रू.२०,०००/– ची मागणी केलेली असुन, तिचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र व प्रस्तुत अर्जातील केलेली कथने विचारात घेता, तिने गैरअर्जदार क्र.१ हा वे.को.ली. येथे

नौकरी करत असल्याचे नमूद करून त्यांचा मासिक पगार रू.१,८०,००/– असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु, गैरअर्जदार क्र.१ यांनी दाखल केलेली त्यांचे पगारपत्रक पाहता, त्यांना दरमहा रू.७४,७३४/– इतके वेतन मिळत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

२०. गैरअर्जदारांचे निशाणी क्र.०९ वरील लेखी म्हणणे दाखल करतेवेळी गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार या वारंवार त्यांच्याशी भांडण करून माहेरी निघुन जात असल्याचे नमुद केले असले तरी, त्याचे कथनाला पुष्टी देणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच गैरअर्जदार क्र.१ हे त्यांचा मुलगा व अर्जदार यांची मुलगी यांचा शैक्षणिक खर्च उचलत असल्याचेदेखील त्यांनी दाखल केलेल्या ऑनलाईन बिलांवरून प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचे मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्रातदेखील त्यांनी ते त्यांच्यावर असलेल्या मुलांच्या जबाबदा–या पार पाडत असल्याचे शपथपुर्वक मान्य केलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ हे वे.को.ली. येथे कार्यरत असून त्यांच्याकडे उप्तन्नाचे साधन असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदाराच्या पालनपोषणाची प्राथमीक जबाबदारी पती या नात्याने गैरअर्जदार क्र.१ ची आहे. तरी गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्न हे पोटगीची रक्कम देतेवेळी लक्षात घेणे न्यायोचीत होईल.

२१. उपरोक्त परिस्थितीत, अर्जदाराने केलेली कथने अधीक ग्राह्य असून पोटगीची रक्कम ठरवीतेवेळी गैरअर्जदार क्र.१ यांचे उत्पन्न लक्षात घेता, तसेच त्याचेवर अवलंबुन असलेले कुटुंबातील ईतर सदस्यांचा, मुलांचा शैक्षणिक खर्चाचा विचार करता व सद्याच्या महागाईच्या काळात प्राथमिक गरजांच्या पुर्ततेसाठी गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार यांना अंतरिम पोटगीसाठी रक्कम रुपये ५०००/– दरमहा मिळण्यास पात्र असल्याचे नमुद करुन अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब, मुद्दा क्र. २ चे उत्तर मी अंशतः होकारार्थी नोंदवत आहे. वरील कारणेमिमांसेकरिता मुद्दा क्र.३ करिता खाली आदेश पारित करत आहे.

पोर्णिमा वि. उमाजी + २

CNR-MHCH130007632024

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार यांना अंतरीम पोटगीकामी दरमहा रक्कम रूपये ५०००/– (पाच हजार रुपये फक्त) अर्ज दाखल तारखेपासून प्रस्तुत प्रकरणामध्ये पुढील आदेश होईपावेतो द्यावे असे आदेशीत करण्यात येते.

३. गैरअर्जदाराने अर्जदारावर यापुढे कोणत्याही प्रकारचा कौटुंबीक हिंसाचार करू नये असे आदेशीत करण्यात येते.

NIKHIL LAXMAN HEMNE

Digitally signed by NIKHIL LAXMAN HEMNE
Date: 2024.10.07 17:49:38 +0530

**(निखील ल. हेमणे)**

स्थळ – राजुरा

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

दिनांक – ०८/१०/२०२४

राजुरा, जि. चंद्रपूर